नि.फौ.ख.क्र.३७/२०२५
निशाणी क्र.१५ लगत

सरकार तर्फे **साक्षीदार क्रमांक.** ०१.

देवाशपथ खरे सांगतो की,

**<u>अर्ज निशाणी १४ वरील आदेशानुसार उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री एन जी शहा यांच्यामार्फतः-</u>**

०५. हे म्हणणे खरे आहे की आरोपीने माझ्याविरुध्द जिल्हाधिकारी यांच्याकडे तीन आपत्य असल्याबाबत केली तक्रार अर्ज क्र.१०१/२०२१ ग्राहय धरुन माझ्या सभासदत्व रद्द केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर मी विभागीय आयुक्त यांच्याकडे अपील क्र.६९/२०२४ दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की, ते अपील नामंजूर झाले आहे. मी जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रकरण सुरू असताना आरोपी माझ्याकडे तक्रार अर्ज मागे घेण्याकरीता पाच लाख रुपयांची मागणी करीत असल्याबाबत तसेच धमकी देत असल्याबाबत जिल्हाधिकारी यांना तक्रारी अर्ज दिला नव्हता.

०६. माझे शिक्षण ५ वी पर्यत झाले असून मला मराठी लिहीता व वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद निशाणी १६ वर इंग्रजीमध्ये सही केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सही खाली मी मराठीत माझे नाव लिहीलेले आहे. फिर्याद दिल्यानंतर मी वाचून पाहिली होती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादमध्ये आरोपीने माझ्याकेडे पाच लाख रुपये किती तारखेला व कोणत्या ठिकाणी मागितले याचा उल्लेख नाही. प्रस्तुत फिर्यादपुर्वी आरोपी वेळोवेळी धमकी देत असल्याबाबत त्या त्या वेळी मी पोलीस ठाण्यात तक्रार दिली नाही.

०७. हे म्हणणे खरे आहे की, निमगांव येथे जुन २०२४ पासून पोलीस मदत केंद्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, निमगांव ते इंदापूर मधील अंतर साधारणतः १५ कि मी आहे. हे म्हणणे खरे आहे की, इंदापूर पोलीस ठाणे इंदापूर पुणे सोलापूर महामार्गालगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे तथाकथीत घटनेवेळी दुचाकी व चारचाकी वाहन होते. हे म्हणणे खरे आहे की, निमगांव येथून इंदापूरला जाण्याकरीता एस.टी. बस व खाजगी वाहने आहेत.

०८. मी व माझा भाऊ इमारतीच्या बांधकामाचे काम करीत असल्याबाबत आमच्याकडे तसा परवाना नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिव्या ही माझ्या भावाची मुलगी आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिव्या ही माझी मुलगी आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिव्याच्या जन्मावेळी ग्रामपंचायत जन्म नोंदवहीत दिव्याचे वडिल म्हणून माझ्या नावाची नोंद लागली होती. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायत अभिलेखात खाडाखोड करुन दिव्याच्या वडिलांचे नाव दत्तात्रय असे नोंद करण्यात आले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे तक्रार झाल्याने जिल्हाधिकारी यांनी माझे सभासदत्व रद्द केलेले आहे.

०९. मी फिर्याद देतेवेळेस पोलीसांना विश्वकर्मा कन्स्ट्रक्शनमध्ये कोण भागीदार आहे याबाबत तसेच नोंदणीबाबत कागदपत्रे दिलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीच्या विवाहावेळी आरोपीने मुलीचा विवाह कसे करतो हे पाहतो, मुलीचे लग्न होवू देणार नाही अशी धमकी दिल्याबाबत त्यावेळी पोलीस ठाण्यात तक्रार दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी

आरोपीला संतोष हेगडे व राजकूमार शेंडे यांच्या समक्ष त्याच्या घरी जावून दोन लाख रुपये कोणत्या तारखेला दिले याबाबत फिर्यादमध्ये सांगितलेले नाही. मी त्यावेळी माझ्याकडे दोन लाख रुपये होते याबाबतचा पुरावा पोलीसांना दिला नव्हता. राजकूमार हा माझ्या भावकितील आहे. राजकुमारच्या पत्नीचे नाव सुरेखा आहे. आरोपीचा भाऊ रविंद्र याच्याविरुध्द सुरेखाने भा.द.वी. कलम ३५४ अन्वये फिर्याद दिल्याचे मला माहित नाही. त्यामुळे आरोपी व राजकुमार यांच्यामध्ये वैमनस्य असल्याचे मला माहित नाही.

१०. माझ्या पुतण्याचे नाव अभी आहे. संतोष व अभी हे मित्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी राजकिय क्षेत्रातील आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी राजकिय क्षेत्रात होतो. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२४ पयर्त मी भारतीय जनता पक्षाचा पदाधिकारी होतो. आरोपी हा भारतीय जनता पक्षाचा ओबीसी सेलचा अध्यक्ष होता हे मला माहित नाही.

११. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला रोख दोन लाख दिल्याचे आणि आरोपीच्या खात्यावर पन्नास हजार पाठविल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद दिली त्यावेळी पोलीस निरीक्षक कोकणे हे होते. पोलीस निरीक्षक कोकणे यांच्याविरुध्द आरोपीने उपोषण केले होते याबाबत मला माहित नाही. त्याचप्रमाणे आरोपीने कोकणे यांच्याविरुध्द मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री व गृहमंत्री यांच्याकडे तक्रार केली होती याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे कोकणे यांनी मला बोलावून आरोपीविरुध्द खोटी फिर्याद देण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी खोटी फिर्याद दिली.

१२. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे कथीतरित्या आरोपीस अडीच लाख रुपये दिल्यानंतर दोन वर्षाने प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सन २०२२ पासून भाजप उपाध्यक्ष असल्याने माझा भाजपचे पदाधिकारी, तहसिलदार, जिल्हाधिकारी व पोलीस यांच्याशी नेहमी संबंध येत होते. फिर्यादमध्ये मी भाजप तालुका अध्यक्ष असल्याचे नमूद असल्याचे वाचले होते. त्यावेळी माझ्या लक्षात आले नसल्याने मी पोलीसांना ते चूकीचे लिहीले आहे याबाबत सांगितले नाही.

१३. हे म्हणणे खरे आहे की, संपुर्ण फिर्यादमध्ये आरोपीने कोणत्या तारखेला धमकी दिली व मी आरोपीस कोणत्या तारखेस पैसे दिले याचा तपशिल नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या कथीत धमकीमुळे त्याला पैसे दिले असे मी पोलीसांना मी फिर्याद देतेवेळे सांगितले नाही. मी फिर्याद दिल्यांनतर साधारणतः ३ महिन्यांनी कलम १६४ अंतर्गतचा जबाब दिला होता. न्यायालयात जबाब देण्याकरीता मला पोलीसांची नोटीस आली होती. ती नोटीस किती तारखेला आली होती हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला न्यायालयात जबाब देण्याकरीता पोलीसांना आणले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला फिर्यादप्रमाणे जबाब दिला नाही तर माझ्यावर कार्यवाही होईल असे सांगितल्याने मी कलम १६४ अंतर्गतचा जबाब दिला. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांच्या दबावाखाली कलम १६४ अंतर्गचा जबाब दिला.

१४. हे म्हणणे खरे आहे की, मी कलम १६४ अन्वयेचा जबाब नि.१८ मध्येदेखील आरोपीने किती तारखेला व कोणत्या ठिकाणी धमकी दिली मी आरोपीला किती तारखेला रक्कमा दिल्या याबाबतचा तपशिल सांगितलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कलम १६४ चा

जबाब नि.१८ मध्ये माझ्या व आरोपीच्या बँक खात्याचा तपशिल दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि०९/१०/२०२४ रोजी जिल्हाधिकारी यांनी निकाल दिल्यानंतर प्रस्तुतची फिर्याद दि.०५/११/२०२४ रोजी दाखल केली आहे.

१५. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या तक्रारीमुळे माझे ग्रामपंचायत सदस्यत्व रद्द झाल्याचा माझा आरोपीविरुध्द राग होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात आरोपीने जिल्हाधिकारी यांच्यासमोरील प्रकरणात वारंवार माझ्याकडे केस मागे घे, पैसे दे अशी मागणी केल्याचे व धमकी दिल्याचे खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्याकडे पाच लाखंची मागणी केल्याचे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने धमकी दिल्यासने मी आरोपीच्या खात्यावर अडीच लाख पाठविल्याचे खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने माझ्या मुलीचा विवाह कसा करतो असे म्हणून धमकी दिल्याचे व त्यानंतर आरोपीच्या भीतीपोटी मी त्याला दोन लाख रोख दिल्योच खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी आरोपीस पुन्हा ५० हजार रुपये पाठविल्याचे खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर आरोपी मला व्यवसाय करु देणार नाही अशी धमकी देवून वारंवार पैसे मागत असल्याने मी फिर्याद दिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास–पुर्ण.</u>

<u>फेरतपास–नाही.</u>

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT Date: 2026.04.20 15:39:30 +0530

दिनांकः२०/०४/२०२६ (प्र.चं.बारटक्के)

ठिकाण – इंदापूर. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.